# वीरशैवांची स्फुट रचना

**कु.हर्षाराणी रुद्राप्पा अजबे**

*प्राचार्य, विठाबाई पसारकर विद्यामंदिर, केकतउमरा ता.जि. वाशीम*
*harshaajabe@gmail.com*

**प्रस्तावणा**

महाराष्ट्र संत महंतांची, शुरविरांची व देशभक्तांची भूमी आहे. महाराष्ट्रात अनेक धार्मिक आध्यात्मिक परंपरा उदयास आल्या व समृद्ध झाल्या प्रत्येक परंपरेने मराठी सारस्वताचे भांडार आपापल्या परीने समृद्ध केले. नाथ, महानुभाव, वारकरी, शैव व वीरशैव हे सर्व ज्ञान भक्तिप्रधान विचार प्रवाह एकत्र आले. सर्वत्र एकच शिव विद्यमान आहे. हे लक्षात घेऊन सर्वांनी समन्वयाचा मार्ग चोखाळला. चक्रधर ज्ञानेश्वर या संतांनी मनुष्याला केंद्रस्थानी ठेवून जे कार्य केले तेच कार्य वीरशैव संतांनी केले.

**निजू नका जागा जागा आपुल्या स्वधर्माने वागा**

**सदा भस्म लावा भाळी लिंगपूजा बिल्वदळी**

**सांडोनी शिवा ते दुजियाते ध्याती त्यांचे तोंडी माती जन्मोजन्मी**

असा शिवभक्तीचा शंख फुंकून निद्रिस्त वीरशैवांना जागे केले ते श्रीमन्मथस्वामींनी. सोळाव्या शतकात महाराष्ट्र परधर्मीयांच्या प्रभावाखाली होता. राजकीय स्थित्यंतरांमुळे वीरशैवधर्मावरही संकट आले. परधर्मीयांचा जुलुम आणि दुसरीकडे वारकरी संप्रदायातील भक्तिपूर्ण अभंगाचे आणि किर्तनाचे आकर्षण यात वीरशैव समाज सापडला अशा बिकट परिस्थितीत संतशिरोमणी श्रीमन्नथस्वामींचा अवतार झाला. शिखरशिंगणापूरच्या शांतलिंग स्वामींनी पश्चिम महाराष्ट्रात आणि कपिलधारच्या मन्मथस्वामींनी मराठवाड्यात इष्टलिंगभक्तीचा जागर केला. वाट चुकलेल्य वीरशैवांना सन्मार्ग दाखविण्यासाठी श्रीमन्मथस्वामींनी परमरहस्य, गुरूगीता, अनुभवानंव ज्ञानबोध, स्वयंप्रकाश इत्यादी ग्रंथ रचले, अभंगरचना करून शिवभक्तीचे माहात्म्य लोकांना पटवून दिले. ज्यांना कीर्तन-भजनाची गोडी होती व जे त्यासाठी वारकरी पंथाकडे वळले होते त्यांच्यासाठी शिवभक्तीपर अभंग, भारूडे, पदे लिहिली.

सोळाव्या शतकापासून प्रारंभ झालेली वीरशैव वाड्:मयसरिता आज एकविसाव्या शतकापर्यंत चांगली सौष्ठवपूर्ण झालेली आहे. वीरशैववाड्:मय विविध वाड्:मय प्रकारांनी समृध्द झालेले आहे. गद्य-पद्य चरित्रे, ओवीग्रंथ, अभंग, आख्यानकाव्ये, तीर्थमालिका, स्तोत्रे, काव्यसंग्रह, संगीतिका, स्फुट काव्यात पदे, आरत्या, भुपाळ्या, अष्टके, पाळणा, गीते, कटाव इत्यादी प्रकार आहेत, तसेच भारूड, गबाळ, वडप किंवा खापरीगीते, डफगाणी, पोवाडे इत्यादीचा समावेश आहे.

लक्ष्मण महाराज हे वीरशैव संतकवीतील लोकसाहित्यीक आहेत. मराठी वीरशैव वाड्:मयमंदिराचा पाया शांतलिंग व मन्मथस्वामी यांनी रचला आहे, तर लक्ष्मणमहाराज त्या मंदिरावरील कळस झाले आहेत. लक्ष्मण महाराजांच्या वाक्यात वैपुल्य आहे. तशीच विविधता देखील आहे. अभंग-ओवी या वाड्:मय प्रकारांबरोबरच त्यांनी कथात्मक अभंग, मराठी पदे, हरदासी पदे, हिंदुस्थानी पदे, ही लिहिली आहेत. तसेच भूपाळ्या, आरत्या आणि वासुदेव या रचनां शिवाय कापडी, बाळसंतोष, फुगडी, बसवी, गस्त, कोल्हाटीण, पिंगळा, भोळी, जागल्या, जोगवा, गोंधळ वाघोबा अशी रूपकेही रचली आहेत. या बरोबरच अनेक वीरशैव संतकवींनी मराठी वीरशैव साहित्यात फार मोलाची कामगीरी केली आहे. वीरशैव संतकवींनी केलेल्या स्फुट रचनांचा थोडक्यात आढावा आपण या निबंधात घेणार आहोत.

पद

श्रीमन्मथ स्वामी पहिले अभंगकार पदरचनाकार होत. संत ज्ञानेश्वरांनी ज्याप्रमाणे तेराव्या शतकात भारतीय विचारविश्वाचा गाभा आणि उपनिषदांचे सार असणाऱ्या गीतेवरील टीका "ज्ञानेश्वरीच्या" रूपाने लिहून जनसामान्यांवर उपकार केले त्यांच्याच प्रमाणे "परमरहस्य" ही शैवविचाराचा वारसा सांभाळणाऱ्या वीरशैवमत प्रतिपादक ग्रंथावरील टीका लिहून वीरशैव समाजावर खूप मोठेउपकार केले आहेत. प्रस्तुत पदात गुरु दर्शनाची ओढ भक्ताला लागल्याचे वर्णन असून त्याला ज्ञानदुधाची आस लागली आहे.

**गुरुराज माउली ग, माय माझे गुरुराज माऊली ॥धृ॥**

**वत्सालागी धेनु जैसे उचलीत ये पाऊली ॥1 ॥**

**नको अंत पाहू माझा त्वरीत ये सुखकर साऊली ॥2॥**

**ज्ञान दुधाची आस लागली करी कृपेची साऊली ॥3॥**

**मन्मथ शिवलिंग वाट पाहे सत्वर ये धाऊनी ॥ 4॥**

**लक्ष्मण महाराजांची एक पदरचना आहे.**

**सख्यांनो प्या नामामृत सार। मग सुखे करा संसार ॥धृ॥**

**असंख्य दोषी हिंसक तरले। ब्रह्महत्यारी फार ॥1॥**

**सुलभ साधन अति सोपे रे। भवसिंधु व्हाल पार ॥2॥**

**अक्षय स्मर हा शिवनामाचा। प्रेमे करा उच्चार ॥3॥**

**लक्ष्मण म्हणे प्रेमाचे सखे व्हाल। जैसा हा गणेश कुमार ॥4॥**

सातारा जिल्ह्यातील जांब येथे माहेश्वर कुळात जन्मलेले महादेवप्रभू त्यांनी शिवभक्तीपर अभंग, पदे, आरत्या, हिंदी पदे, भारुडे रचली आहेत. या पदात साधू संगती ब्रह्मपदाची जोड कशी मिळाली याचे वर्णन नादमधुर शब्दात केले आहे.

**साधू संगती गोड, झाली ब्रम्ह पदाची जोड ॥धृ॥**

**षड्रिपुकानन कंटक होते ज्ञानकुठारे तोड केली ॥1॥**

**अमृतबीज रोपुनिया जेणे कृपाघनाने वाढविली ॥2॥**

**प्रभू महादेव म्हणे शीतल छाया स्वात्मसुखिची झोप आली॥3॥**

देह क्षणभंगूर आहे. माझे माझे म्हणायचे सोडून शिवाचे नामस्मरण करा नाहीतर जीवनाची फजिती होईल या आशयाचे पद गंगाधरस्वामी वडांगळी कर यांनी लिहिले आहे. नाशिक जिल्ह्यातील वडांगळी मठावर ते पिठाधीश होते. त्यांनी वीररहस्य, (परमेश्वर आगमावर टीका) शिवविजय (शंकर संहितेवर टीका) शिवकथामृत (केदार खंडावर टीका) मदनांतकस्तोत्र, त्रीपुंडमाहात्म्य व सुमारे 1000 अभंग, पदे व भारुडे यांचे लेखन केले आहे. वीरशैवधर्मजागृतीसाठी शिवनाम सप्ताहिचे आयोजन ते करत असत.

**देह जायाचा जायाचा। कदापि नाही राह्याचा ॥ धृ॥**

**पाचाचा आणिला उसना। शेखी ज्यांची तो नेईल जाणा ॥1॥**

**आप तेज वायू गगन। यांचे अंश नेले याने ॥2॥**

**देह जायाचा जायाचा कदापि नाही राह्याचा ।**

अशा प्रकारची रचना केली आहे. तसेच सदानंदबुवा जोडजवळेकर यांनीही पदरचना केली आहे. ते कीर्तनकार होते. अनेक भारुडे, पदे, आरत्या, पाळणे त्यांनी रचले आहेत.

पाळणा

पाळणा हे लोकगीत प्राचीन काळापासून सर्व ज्ञात आहे. मूलतः हे स्त्री गीत आहे. पण अनेक नामांकित कवींनी पाळणे रचले आहेत. देवी-देवतांचे थोर पुरुषांचे पाळणे, रचिले व गायिले जातात. वीरशैव कवींनी सुद्धा पंचाचार्य, महात्मा बसवेश्वर, अक्कमहादेवी, मन्मथस्वामी, यांच्यावर पाळणे रचले आहेत. बाळाच्या जन्मानंतर बाराव्या दिवशी नामकरण करण्याच्या वेळी पाळणा म्हणण्याची प्रथा आहे. बाळाला पाळण्यात टाकून बारा दिवसा पर्यंतचे त्याचे कर्तृत्व त्यात वर्णिले जाते. पाळणे म्हटल्यानंतर बाळाचे नाव ठेवण्यात येते. साबांप्पा ब्याळे यांनी पंचाचार्यांचे वर्णन असणारा त्यांच्या वैशिष्ट्यांसह सुंदर पाळणा रचला आहे.

**बाळा जो जो रे जगदुरु आचार्या। दर्शने ही पावन काया ॥धृ॥**

**ब्रह्मा विष्णू हे स्तविती। ताप शमाया। पावन त्या करीता सदया ॥**

**आद्य रेणुक जगी अवतरले। अगस्तीसी उपदेशिले ।**

**नास्तिका शासन केले। पिण्या बोधामृत। आले शरण तव पाया।**

**दिले लिंग शंकराचार्या ॥1 ॥ बाळा जो जो रे.**

हा पाळणा पंचाचार्यांवर असल्यामुळे यामध्ये पाच कडवे आहेत. पण इतर वेळी मात्र पाळणा 9, 11, 13, अशा कडव्यांचा असतो.कागल जिल्हा सोलापूर येथील अप्पाराव धोंडीराज मूरतुले यांनी सुमंत या नावाने लेखन केले आहे. 'माझे दुर्दिन', 'कन्यादानफळ' आणि 'शोकतरंगिनी' हे त्यांचे दीर्घकाव्य तर 'मौक्तिकमाला' आणि 'भवनिनाद' हे त्यांचे काव्यसंग्रह सुमंत यांनी लिहिलेला बसवेश्वरावरील पाळणा काव्यदृष्ट्या उच्च दर्जाचा आहे. अलंकाराने नटूनही सुलभ व सुगम अशी रचना आहे.

**श्री नंदिकेश्वर अवतारा। जो जो जो बसवकुमारा ॥धृ॥**

**वेदांती वाखाणीयली। जी वीरशैव महती।**

**तीज काळ गतीने आली। मृत कळा छळाने जगती।**

**कर्माने गिळिले ज्ञाना। तम जमले तेजाभोवती ।**

**निद्रेचा अंमल चढला। जनअवनत घोरत पडला।**

**तूजचि मात्र जागर घडला । लिंगायत धर्मोद्धारा ॥1॥**

**बाळा जो जो रे बसवकुमारा..**

अशाप्रकारे हा एकूण पाच कडवी असलेला पाळणा आहे.

शिवदास यांनी अक्कमहादेवीचा पाळणा रचला आहे. त्यात सात्विककळेची अक्कमहादेवी कलाकलाने कशी वाढते आणि तिचे वैराग्यमूर्ती कसे रूपांतर होते. याचे वर्णन अलंकारिक भाषेत केल्यामुळे पाळणा ऐकायला खूप छान वाटतो.

**उमा मातेची सात्विक कळा। अक्कमहादेवी योगिनी बाळा।**

**लिंगांग ज्ञानाची निर्मळ ज्वाळा। जो बाळा जो रे ॥1॥**

**कर्नाटक प्रांती उडूतडी ग्राम। निर्मल शेट्टी पिता शिवभक्ती धाम ।**

**माता सुमती अशी अनुपम। जो बाळा जो रे ॥2॥**

अशाप्रकारचा हा एकूण नऊ कडवे असलेला पाळणा आहे.
निळकंठ हे धारेश्वर मठाचे साहित्याचा ध्यास घेतलेले शिवाचार्य, धर्मप्रचार, परमरहस्यपारायण व धर्मजागरण हेच त्यांचे ध्येय. पाऊले चालती, भक्तीसुधा, परमरहस्यसारामृत, बृहत शिवपूजाविधि इत्यादी पुस्तके संपादित व प्रकाशित केली आहेत. त्यांचा अनेक काव्य गुणांनी युक्त असा मन्मथ स्वामींचा हा पाळणा

**वसंत पंचमी माग महिन्यात। शके चौदाशे ब्यांशी सालात।**

**बाळ जन्मले बालेघाटात। जो बाळा जो रे जो ॥1॥**

**नेकनूर ग्रामी आनंद झाला। शिवलिंगस्वामींना पुत्र लाभला ।**

**वर्णावे किती हर्षानंदाला। जो बाळा जो रे ॥2॥**

हा एकूण बारा कडवे असलेला पाळणा आहे यामध्ये मन्मथस्वामींच्या जन्मापासून त्यांचे गुरूगृही जाऊन घेतलेले शिक्षण त्यांनी रचलेल्या लावण्या, कटाव पदे आणि शिंगणापुरात शिवभक्तीचा केलेला प्रचार आणि पंढरपूरच्या संतांनी शिवतत्त्वाची महती ऐकून मन्मथस्वामींना दिलेली संतशिरोमणी ही उपाधी या सर्वांचा उहापोह या पाळण्यात करण्यात आलेला आहे. अशाच प्रकारे इतरही वीरशैव कवींनी बरेच पाळणे रचलेले आहेत.

**अष्टक**

परमेश्वराला उद्देशून जी प्रार्थना केली जाते त्याला अष्टक म्हणतात ते एक स्तोत्र असते पण त्याची कडवी आठ असल्यामुळे त्याला अष्टक असे म्हणतात. मराठीत शिवगुरुदास, बसवदास, रेवणसिद्धशिवाचार्य, निळकंठ शिवाचार्य आदींनी मन्मथस्वामी, बसवेश्वर आदींवर अष्टके लिहिली आहेत. आर्त भावनेने परमेश्वराकडे मागणे मागून माझा सांभाळ कर, माझा उद्धार कर अशी अष्टकात वारंवार करुणा भाकलेली असते. संस्कृत अष्टका वरून मराठीत हा प्रकार आलेला आहे. गुरुपादया चेन्नबसवअप्पा रेवनशेट्टे हे हनेगाव जिल्हा नांदेड यांनी मन्मथअष्टक व अष्टावरणाष्टक लिहिले आहेत.

**असे पातकी घातकी भक्तिहीन।**

**सदा काम क्रोधा मध्ये मी निमग्न ॥**

**कधी नाही केली तुझी पादपूजा।**

**मला तारी रे मन्मथा शीवराजा ॥1॥**

मी पापी आहे वारी करीत नाही कधी तुझ्या दर्शनाला येत नाही मी माझ्याच प्रपंचात गुरफटलो आहे मला माफ कर तुझ्याशिवाय मला कोण तारणार आहे.

**कधी कार्तिकी पौर्णिमेशी न आलो।**

**कधी नाममंत्रा मुखी वर्णियेलो ॥**

**नसे अर्पिला देह हा स्वामीकाजा।**

**मला तारी रे मन्मथा शीवराजा ॥2॥**

कार्तिक पौर्णिमेला कपिलाधारला खूप मोठी यात्रा भरते अनेक वीरशैव या यात्रेला जातात पण मला मात्र जाता आले नाही. अशी खंत ते व्यक्त करतात. भुजंगप्रयात या वृत्तातील हे अष्टक म्हणताना मनाला खूप आनंद वाटतो. श्रीराम गुळवणे यांचे श्री देशिकेंद्रस्तवनाष्टक प्रसिद्ध आहे. देशिकेंद्र महाराजांचे ते शिष्य होत यात गुरूची प्रार्थना करून त्यांनी वीरशैवात ऐक्य कसे नांदेल, समाज उन्नती कशी होईल, लिंगपूजेचा प्रसार कसा

होईल सद्‌गुरु तू परिस आहेस तु कल्पवृक्ष आहेस तूच आमचे रक्षण कर अशा प्रकारची प्रार्थना त्यांनी या अष्टकात केली आहे.

**जसा लोहखंडास लाभे परीस। दरिद्यापुढे ठाकला कल्पवृक्ष।**

**तसा सद्गुरो! तू आम्हा सेवकास। करी आपणासारखे तूं जनांस ॥**

**तुझे ध्यान ते नित्य नेत्री दिसावे। तुझे बोल कानी सदाचे ठसावे।**

**तुझ्यापायी हे शीर्ष शतदां नमावे। मुखी नाम तुझे अखंडित यावे ॥**

अशा ओळीने त्यांनी आपले अष्टक संपवले आहे.

### आरती

आरती हा सर्वांना परिचित असणारा प्रकार कोणत्याही पूजेची सांगता ही आरती शिवाय होत नाही. आर्त भावनेने केलेली प्रार्थना म्हणजे आरती. वीरशैवांच्या अनेक आरत्या उपलब्ध आहेत टाळ मृदुंग, टाळ्या, घंटानाद करत सामुदायिक रीतीने आरत्या म्हटल्या जातात. सांब बापूअप्पा ब्याळे यांची श्री जगदुरु पंचाचार्य ची आरती प्रसिद्ध आहे.

**मंगलमय महालिंगोद्भव गुरु शिवांग पंचाचार्यांना।**

**लिंगविभूषित भंगभवाब्धी मंगल आरती करू त्यांना ॥धृ॥**

**जन्ममरण भय हरण करोनि पावन करिसी भक्तांना।**

**तन मन भावे अर्पण करितो सिद्ध रेणुकाचार्यांना ॥1॥**

**थोर घोर भव दूर कराया सुरवर भाकिती तव करुणा।**

**वीरशैवमतवारिधिशशिधर स्मरा दारुकाचार्यांना ॥2॥**

ही आरती आपण सर्व वीरशैव खूप तालासुरात म्हणतो पण आपल्याला ही आरती कोणी रचली आहे. हे मात्र अद्याप माहिती नसावं असं मला वाटतं. कदाचित काही अभ्यासकांना माहिती असेलही.शिवदास हे मन्मथस्वामींचे समकालीन शिष्य त्यांची मन्मथ स्वामींची आरती प्रसिद्ध आहे शिवदास हे नेमके कोण? याबाबत अभ्यासकांत अनेक मतभेद आहेत. या आरतीत मन्मथ माऊलींचे चित्र डोळ्यापुढे उभे राहते.

**आरती शिवराजा मन्मथस्वामी महाराजा।**

**वेदांताचे सार, मुख्य पेरिले बीज ॥धृ ॥**

**समाधि महास्थळी सर्पव्याघ्रांची जाळी।**

**निर्वेर श्वापदे हो समदृष्टीने न्याहाळी ॥1 ॥**

**शिवभक्ती लोप झाली, विश्व शिवमय केले।**

**ग्रंथ हा परमरहस्य, गुह्य प्रगट केले ॥2॥**

**अभंगी निरूपण, अनुभविले ज्ञान।**

**आनंद शिवदासा, सर्व शुभ कल्याण ॥3 ॥**

मन्मथस्वामी यांनी त्यांचे गुरू नागेशस्वामी यांच्यावर आरती लिहिली आहे. नागेश संप्रदायात ती नेहमी म्हटली जाते...लक्ष्मण महाराज यांनी वीरभद्राची आरती रचली आहे. वीरभद्र हा वीरशैवांचा मूळ गोत्र पुरुष व अनेक कुटुंबांचे आराध्य दैवत, कुलदैवत आहे. या आरती मध्ये त्यांनी वीरभद्राच्या कर्तुत्वाचा गौरव केला आहे. तसेच लक्ष्मण महाराजांची इष्टलिंगाची आरती प्रसिद्ध आहे.

**आरती विरभद्रा शिवप्रिया महारुद्रा आरती विरभद्रा ॥ धृ॥**

**प्रतापी तू रुद्र थोर काळा प्रति दंडणार**

**दृष्टांचे रे संहार करिसी, भक्तांचे माहेर**

**आरती विरभद्रा**

तसेच लक्ष्मण महाराजांची इष्टलिंगाची आरती प्रसिद्ध आहे.

**आरती इष्टलिंगा श्रेष्ठ प्रज्ञा सुरंगा. ॥धृ॥**

**अहं ध्वनिपरं तू रे सदा सर्वदा सम रे**

**शुद्ध बुद्ध नित्य बा रे भक्ताचे तू जीवन रे ॥1॥**

**अशा प्रकारची इष्ट लिंगाची आरती रचली आहे.**

### पोवाडा

हा वीररसातील लेखनाचा, गायनाचा महाराष्ट्रातील एक प्रकार आहे. वीरांच्या पराक्रमाचे विद्वानांच्या बुद्धिमत्तेचे तसेच एखाद्याच्या सामर्थ्य कौशल्याचे काव्यात्म वर्णन, प्रशस्ती किंवा स्तुती स्तोत्र म्हणजे पोवाडा. पोवाडा रचणाऱ्या गाणाऱ्याला शाहीर असे संबोधतात. धुळे येथील रहिवासी शाहीर सिद्राम बसप्पा मुचाटे यांनी 32 पोवाडे रचले आहेत. सरळ साध्या शब्दात रसभरीत सुंदर चाली म्हणण्याची ढब निष्णानात डफवादन, मधुर आवाज देशसेवेच्या तळमळीने ओतप्रोत असलेले मन त्यांच्या पोवाड्यातून प्रतीत होते. पोवाडा ऐकताना ऐकणाऱ्याच्या शरीरावर रोमांच उभे राहतात व

अंगात वीरश्री संचारते. जी जी र जी हे उच्चार ऐकले की त्यासंबंधित शूरवीरांचा इतिहास डोळ्यासमोर उभा राहतो. विरांगणा कित्तूर चन्नम्माच्या शौर्याचे वर्णन अत्यंत ओजस्वी शब्दात शाहिराने रेखाटले आहे. या पोवाड्यामध्ये राणी चन्नम्माचा जीवन वृत्तांत कथन केला आहे. 'हिंदवी नंगि समशेर नाहली ऑग्ल रक्तानं' या ओळीतून देशाबद्दलचा स्वाभिमान आपल्याला जाणवतो.

**धन्य-धन्य राणी चन्नम्मा ।**

**बनविला जिनं रणांगणी गोऱ्यांचा खिम्मा ॥धृ॥**

**कर्नाटकात जिल्हा बेळगांव। सकल जनां ठावं ।**

**त्यात एक गांव। जयाच नाव असे कित्तूर।**

**तेथे वीरशैव राजा एक शूर। नामें मलसर्ज समर बहादुर ॥ जी ॥**

पोवाड्याच्या मध्ये ठारावीक ओळीवर विशिष्ट चाल पकडली जाते. कुठेतरी अटक घेतल्या जाते आणि अशा पद्धतीने सादर केलेला पोवाडा वीरांचे कौतुक करणारा असतो. या पोवाड्याची लांबी खूप मोठी असते. जवळपास 20 ते 25 मिनिटे चालेल असा एकच पोवाडा असतो. व त्या पोवाड्यातून त्या संबंधित व्यक्तीच्या जीवनातील सर्व घटना इतिहास ठळक घडामोडी आपल्याला ज्ञात होतात. सोलापूरच्या रणसिह नरवीर मलप्पा धनशेट्टीचाही पोवाडा त्यांनी रचलेला आहे.

गीत

एखादी भावना उत्कट शब्दात व्यक्त करणे म्हणजे गीत. अभंग हा वेगळा काव्यप्रकार असला तरी बऱ्याच संतांचे अभंग भावगीताच्या पातळीवर पोहोचलेले आहेत. गीतातही आपल्याला विविध प्रकार पहावयास मिळतील, कोणत्याही गीताला जेव्हा सुरेल संगीताची साथ मिळते तेव्हा ते गीत केवळ आणि केवळ आनंद देणारे असते. कुमार कोठावळे यांनी श्रमधर्मांचे प्रतीक सुंदर या गीतात सिद्धरामेश्वर यांनी सोलापुरात जे तलाव खोदण्याचे कार्य केले ते सामान्य नसून श्रमधर्माचे प्रतीकच आहे. श्रमाला प्रतिष्ठा देणाऱ्या सिद्धराम यांच्या व्यक्तिमत्वाचे या गीतात वर्णन केले आहे.

**श्रमधर्माचे प्रतीक सुंदर नवे निर्मिले रम्य सरोवर ॥धृ॥**

**कुदळ घेऊनी आपुल्या हाती सिद्धराम हे भूमी खणती**

**शिष्यमंडळी ते अनुसरती एक भावना एकचं अतंर नवे निर्मिले रम्य सरोवर ॥2॥**

तुळजापूर येथील रंगनाथ नाथराव जोशी यांनी श्रीकाशीजगदुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांचे चरित्र चौदा गीतातून गाईले आहे. श्री जोशी हे वीरशैव नसले तरी त्यांनी वीरशैव पुरुषांवर लेखन केले आहे. सौसर जिल्हा छिंदवाडा येथील श्रीमती प्रमिलाबाई कोठाळकर यांनी साखरखेर्डा येथील पलसिद्ध स्वामी वरील भक्तीगीते श्री सिद्ध गीतावली या पुस्तकात संग्रहित करून ठेवली आहेत. श्रीपलसिद्धांच्या हजार वर्षापासून भरणाऱ्या दरबाराचे यात्रेचे मठातील ध्यान पूजा पारायण आरती भजन इत्यादी कार्यक्रमांचे या गीतातून वर्णन केले आहे.

**नवल कसे ना कळले कुणाला वर्षे झाली हजार**

**पलसिद्धांचा भरतो कसा दरबार**

**करिती ध्यान पूजा जप कोणी बैसे पारायणी**

**कुणी आरती भजनी नाचती सिद्ध प्रभूच्या अंगणी**

**कीर्तन प्रवचन सतत चालतो नामाचा भडिमार**

**पल्सिद्धाचा भरतो कसा दरबार.**

रेवणसिद्ध राजप्पा मधाई यांनी श्री सिद्धरामेश्वर यांची वचने अक्कमहादेवीची वचने यांचा अनुवाद समीक्षात्मक व शैक्षणिक लेखन रुद्राध्याय याचा व सूक्ष्म उगमाचा अनुवाद इत्यादी साहित्य लेखन केले आहे त्यांनीही अक्कमहादेवी वर गीतरचना केल्या आहेत. तसेच मला सांसारिक सुखाची अपेक्षा नसून माझे अंतरंग उघड अशी आगळीवेगळी दिक्षा शंकराजवळ मागणारी कवयित्री शकुंतला शंकरआप्पा अनसिंगकर विदर्भातील वाशिम येथे शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या त्यांनी वीरशैव व वीरशैव इतर अनेक संतपुरुषावर गीते रचली आहेत.

**आले तुझ्या मी दारी घेऊन या ही झोळी**

**मज भीक घालून शिवा सर्वाहूनी निराळे**

**अन्नाची नाही आशा कृष्णा मला जलाची**

**धन वैभवाची नाही आशा मला कशाची**

**आशा गुरु कृपेची हृदयात एक वरली**

**मज भीक घा शिवा सर्वाहूनी निराळी**

श्रीमती शोभा मुखेडकर यांच्या पुष्पांजली या नावांनी काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला त्यांच्याही रचना असून उत्कट भक्तिभाव सरलता व माधुर्य इत्यादी काव्य गुणांनी युक्त रचना केल्या आहेत.

जळी स्थळी काष्टी पाषाणी

**शोधिते मी बाई शूलपाणी**

**आतुर लोचने पहावया रुप**

**सदा शिवाचे लागले वेड शिवदर्शनाचे**

यानंतरची नवा मनू आला ही रचना आहे डॉ. शे. दे पसारकर यांची ते कवी संशोधक संपादक कादंबरीकार संत चरित्रकार संत काव्य विवेचक भाष्यकार अनुवाद करता अशा अष्टपैलूंनी संपन्न असलेले व्यक्तिमत्त्व आहे, त्यांनी मुख्यतः वीरशैव मराठी साहित्याचे संशोधन संपादन समीक्षा व निर्मिती केली आहे परमपूज्य काशी जगदुरुच्या कन्नड आशिर्वचनाचा मानवाला जगण्याची दिशा देणारा अनुवाद केला आहे. तो ग्रंथ जन्म हा अखेरचा या नावाने प्रत्येक वीरशैवाच्या घरी आपल्याला पाहावयास मिळतो. तसेच श्रीसिद्धांतशिखामणी या संस्कृत ग्रंथावरील अभंग रुपात श्रीसिध्दांतशिखामणी अभंग गाथा ओवीबद्ध रुपात सिध्दांतशिखामणीतत्वामृत आणि अनुष्टुभ छंदात रेणुकगीताईचे त्यांनी लेखन केले. त्यांना शिवकवी ही उपाधी प्राप्त झाली आहे. आज या ग्रंथांचे वीरशैवांच्या घरोघरी पारायणे होतात. पहिल्या अखिल भारतीय वीरशैव साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या विषयी एव्हढ्या कमी शब्दात सांगणे केवळ अशक्य असे मत श्री अशोक मेनकुदळे यांचे आहे. त्यांनी महात्मा बसवेश्वरांच्या चैतन्यमय क्रांतिकारक कार्याचे तेवढ्याच चैतन्यमय व प्रासादिक शब्दात कवीने वर्णन केले आहे.

**समतेचा डिंडीम गर्जला अरुणोदय झाला**

**तुझ्या रूपे श्री बसवा भूवरी नवा मनू आला**

**उंबरठ्याच्या आतच चिनले होते जे श्वास**

**करूनि मोकळे त्यास दाविला जागृतीचा दिस**

**ओठा मधुनी त्यांच्या झरले अमृत वचनांचे**

**विमुक्त कुंतल सोडूनी अक्का महादेवी नाचे**

**तुझ्या यशाचा त्रिवार डंका गगनी दुमदुमला**

**तुझ्या रूपे श्रीबसवा भूवरी नवा मनू आला**

**तुलाच गाऊ तुलाच ध्याऊ तव दर्शन घेऊ**

**काय कवे कैलास मंत्र हा जपत सदा राहू**

**काजळ अवघे नभातले हे फिटून जाईल**

**रक्तसड्यांची शिंपन इथली मिटून जाईल**

**शुध्द मोकळा श्वास घेऊनी पुनः आठवु तुला**

**तुझ्या रूपे श्रीबसवा भूवरी नवा मनू आला**

अशा प्रकारची ही सुंदर रचना आहे. निलकंठ यांनी संत शिरोमणि मन्मथस्वामीच्या कार्याचे नेमक्या शब्दात वर्णन केलेली असून प्रथम शाहीर असलेल्या मन्मथ स्वामींचे गुरू उपदेशानंतर संत कवित कसे रूपांतर झाले याचा आलेख रेखाटलेला आहे.

कटाव

वीरशैव कवींनी मराठीत रूढ असलेल्या सर्व प्रकारच्या रचना केल्या आहेत ही रचना आख्यानातून दिसून येते. आख्यानात ओवी साथी दिंडी कटाव अशी रचना करून मनोरंजकता वाढवली जाते सदानंद बुवांनी गंगाधर स्वामींच्या चरित्र आख्यानातून घेतलेला कटाव यात गुरु महाराजांच्या लिंगपूजेचे सुमधुर वर्णन केले आहे अनुप्रासात्मक रचनेमुळे कटाव कर्णमधुर झाला आहे.

**लिंगार्चनाते कैसे बसती आसन घालून पाटावरती**

**भस्म चर्चिले अंगावरती थाट पहा किती रांगोळ्यांचा**

**घमघमाट बहु उद्बत्यांचा सुवास सुटला बेल फुलांचा**

**दोहो बाजूला समया जळती सेवक जन ते पुढे तिष्ठति**

**पंचरत्ने बहूपंचामृती स्वामी लिंगा अभिषेक करिती,**

**वडप**

वडप किंवा व्हडप हा खास वीरशैव गीतप्रकार आहे. तो वेगवेळ्या भागात वेगवेगळ्या नावाने परिचित आहे. ज्यांचे कुलदैवत वीरभद्र आहे असे कुटूंबीय लग्न समारंभात हा विधी करतात. गुग्गुळ, खापरीपूजा, धुप जाळणे अशा विविध नावाने हा विधी ओळखतात. घराबाहेर गेल्यानंतर चौका चौकात सर्व समुदायासह वडप म्हणतात. तो एक पथनाटयासारखा प्रकार असतो. वडप म्हणणारा एक चरण म्हणतो व थांबतो त्यावर सर्व सहप्रवासी ओम नमः शिवाय म्हणतात. पुन्हा दुसरे चरण म्हणतात हा सर्व विधी वीरभद्र देवाच्या नावाने केला जातो. यात एका प्राचीन कथेचे बीज दडलेले आहे. वडप हे लोककाव्य आहे. त्यामध्ये नाट्य आहे. तसे ते दृष्यकाव्य, नाटक अशा अनेक अंगाने प्रदर्शित केले जाते. नागलिंग व शंकरमृगेंद्र यांचे मुद्रिकेत नाव असलेले वडप उपलब्ध आहेत. त्यात वीरभद्राच्या अतुलनीय शौर्याचे वर्णन आले आहे. तसेच वीरभद्राच्या शरभावताराचे वर्णन पण यात आले आहे.

**अहा रे वीरा। अहा रे शरभा ॥**

**नरसिंहाचा गर्व गाढा। वीरभद्र करी चुराडा ।।**

**धरोनि शरभ अवतार। नरसिंहाचे तोडी शिर ॥**

**तेणे देव करिती जयजयकार ॥**

**कर्ण शिवा कर वीरभद्रा कालान्तक रूद्रा ।।**

### भारूड

'भारूड म्हणजे बहुरूढ' रचना' अशी भारूडाची व्याख्या केली जाते. भारूड हा गेय काव्यप्रकार आहे. भारूड गातांना साभिनय सादर करण्याची प्रथा आहे. सांसारिक, व्यावहारिक जीवनातील संकल्पनांचा परमार्थक्षेत्रात वापर करणे म्हणजे रूपक अथवा भारूड होय.

मन्मथस्वामींचा एक "जोहार" आहे. हा कैलासनगरीचा म्हणजचे शंकराचा महार जीवात्म्यांना स्वतःचे हित करून घेण्यासंबंधी सांगतो. अज्ञानाचा अंधार नाहीसा झाला की अहंकार नाश पावतो ज्याचा अहंकार नष्ट होतो त्याची घोर संसारातून सुटका होते व त्याला शिवपद प्राप्त होते अशा अर्थाचे हे भारूड आहे.

**जोहार जोहार जी मायबाप जोहार। मी कैलासनगरीचा महार ॥**

**त्या नगरीचा सर्व विचार। मजकडे की जी मायबाप ॥**

### फुगडी

संतांसोबत फुगडी खेळत फिरलो तर जन्माजन्मांतील फिरणे थांबते जन्मफेरा खुंटतो अशा आशयाची फुगडी लिंगेश्वर यांनी रचली आहे. लिंगेश्वर रचीत या फुगडीत पारमार्थिक उपदेश केलेला आहे. जिचा कासोटा बळकट आहे. म्हणजेच जिचे चारित्र स्वच्छ आहे. पण जी परमार्थ करतांना धाडसी होऊ शकते अशी स्त्रीच (जीव) कैलास गाठू शकतो. म्हणून सावध चित्ताने शिवस्मरण केले पाहिजे.

**फुगडी फू गे मनमळ धु गे। संता शरण जा गे। ब्रम्हरूप हो गे ।।**

**फुगडी घ्याल ठाई। सम डोल देही। विषम पोरी भागली। निर्धार करून पाहिली ।।**

### ताकीदपत्र

ताकीदपत्र याचा अर्थ समज देणे. राजाकडून गावच्या पाटील- कुलकर्ण्याला नीट वागण्याविषयी, गावाचे हित पाहण्यासंबंधी समज दिली जात असे. शिवदासकृत या ताकीदपत्रात देहरूपी गावात राहणाऱ्या मनाजीपंत कुलकर्णी (मनाला) ताकीद देण्यात आली आहे. मनाजीपंताने गावाची फार खराबी केली, परमार्थाच्या वाटा बंद केल्या म्हणून तुम्हाला धरणे येईल अशी भीती घातली आहे. शिव शिव असा उच्चार केल्यावर मात्र काही उणे पडणार नाही.

**ताकीदपत्र राजश्री मनाजीपंत कुलकर्णी ।। मुक्काम देहनगर यासी ॥**

**जीवाजी शिवाजी मनपूरवाले। शरण शरणार्थ विनंती विशेषः**

ताकीदपत्र देण्यास कारण की तुम्ही या गावचा फार खराबा केला आहे ॥ तर ज्यावेळी तुम्हास धरणे येईल। त्या वेळेस तुम्ही कोणाचे नाव सांगाल॥ जिवाजी म्हणजे देह करता करविता। भी उगाच डौले मिरवीता।

### पिंगळा

पिंगळा भविष्यकथन करतो, अशी लोकसमजूत आहे. जुन्या काळी भविष्य सांगणारा मनुष्य पिंगळ्याप्रमाणे झाडावर बसून भविष्यकथन करीत असे. लक्ष्मणमहाराजांनी या रचनेत कलियुगात कोणकोणते अनर्थ होतील याचे भविष्य वर्तविले आहे. अतिवृष्टी होईल अनावृष्टी होईल. माहामारी होऊन तरूणांना बालकांना खाऊन टाकील, सत्याचा लोप होऊन असत्याला महत्व येईल इत्यादी.

**पिंगळा गजबजिला महाद्वारी तो एका ।**

**सांगतो लोका। पिंगळा गजबजिला ॥धृ॥**

**काळ आला दुर्धर। धर्म बुडेल फार।**

**फार होतील जार चोर। अल्प आयुषी नर ।।1।।**

**सत्य ते लोपेल। होईल असत्या मोल ।**

**वर्णा संकर होतील। उन्मत्त कोल ॥2॥**

**लेक मारील बापाला। स्त्री भ्रताराला।**

**शिष्य वधील गुरुला। मोठा दिसे हा घाला ॥3 ॥**

### गोधळ

श्रीलक्ष्मणमहाराजांनी रचलेला गोंधळ प्रसिध्द आहे.

**अनंते ब्रम्हांडे निर्मुनी।स्वस्थ बैसली आसनी।**

**आईची अगम्य करणी।नाही लिप्त माझी आई॥1॥**

**परब्रम्ह शिवाईगे। परात्पर काशीपूर। तेथे शिवाई सुंदर।**

अशा प्रकारे संतांनी विविध प्रकारांच्या स्फुट रचना करुन वीरशैव वाङ्:मय समृध्द केले आहे.

**निष्कर्ष**

१) मन्मथ स्वामींनी सोळाव्या शतकात शिवभक्तीचा शंख फुंकून निद्रिस्त वीरशैवांना जागे केले.

२) पश्चिम महाराष्ट्रात शिखर शिंगणापूरच्या शांतलिंग स्वामींनी इष्टलिंग भक्तीचा जागर केला.

३) मन्मथ स्वामी हे पहिले अभंगकार, पदरचनाकार होते.

४) पाळणा, अष्टक, आरती, जोगवा, पोवाडा, कटाव, जोहार, वडप, भारुड, फुगडी,

ताकीदपत्रअशा सर्व प्रकारच्या स्फुट रचना वीरशैव संतांनी केल्या आहेत.

५) लक्ष्मण महाराजांच्या साहित्यात आख्यानकाव्ये व विविध प्रकारच्या स्फुट रचना आढळतात.

**संदर्भ**

१) "श्री लक्ष्मण गाथा", संपादक डॉ.शे.दे. पसारकर प्रकाशक कृष्णकांत राजाराम अष्टेकर,श्री लक्ष्मण गाथा, प्रकाशन समिती आष्टी, मे २००१,

२) "वीरशैवांची स्फुट कविता" संपादक शांतितीर्थ स्वामी,श्री काशी जगद्गुरु विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठ,जंगमवाडी मठ, वाराणसी प्रकाशक रे.रा. मगाई